आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
रविवार, दिनांक १७ मार्च २०२४

<u>ठळक बातम्या</u>

1. भारत निवडणूक आयोगाकडून लोकसभा निवडणुकीसाठी आदर्श आचारसंहितेच्या प्रभावी अंमलबजावणीकरता मार्गदर्शक तत्त्व जारी.

2. सर्वोच्च न्यायालयाच्या रजिस्ट्रीमधून निवडणूक रोख्या संबंधित डिजीटल स्वरूपात प्राप्त केलेली माहिती आजपासून निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध.

3. विदर्भातील सर्व जिल्ह्यांत निवडणुकांसाठी तय्यारी सुरु-आचारसंहितेचा भंग होत असल्यास सी-व्हिजिल अँप वर तक्रार नोंदविण्याचं नागरिकांना आवाहन.

4. आज सायंकाळी शिवाजी पार्क इथं भारत जोडो यात्रेच्या समारोप सभेतून इंडिया आघाडी लोकसभा निवडणुकांच्या प्रचाराची करणार सुरुवात.

आणि

5. आज पूर्व विदर्भामध्ये तुरळक ठिकाणी गारपीट, विजांचा कडकडाट आणि वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता.

*****

<u>आदर्श आचारसंहिता</u>

निवडणूक आयोगानं लोकसभा आणि चार राज्यांच्या विधानसभा निवडणुकीच्या घोषणेनंतर आदर्श आचारसंहितेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक तत्त्व जारी केली आहेत. निवडणूक आयोगानं कॅबिनेट सचिव, सर्व राज्यांचे मुख्य सचिव आणि मुख्य निवडणूक अधिकारी यांना, यासंदर्भात पत्र पाठवलं असून, रेल्वे स्थानकं, बस आगार इत्यादी सार्वजनिक ठिकाणांवरचे राजकीय जाहिराती असलेले सर्व अनधिकृत फलक, बॅनर इत्यादी, ४८ तासांमध्ये हटवण्याचे निर्देश दिले आहेत. कोणताही राजकीय पक्ष किंवा उमेदवाराला निवडणूक प्रचारासाठी सरकारी वाहन वापरता येणार नाही. इलेक्ट्रॉनिक आणि प्रिंट मीडियावर सरकारी लाभ सांगणाऱ्या जाहिरातींना अनुमती नाही. मुख्य निवडणूक अधिकारी आणि जिल्हा निवडणूक अधिकारी अशा प्रकारच्या जाहिराती रोखण्यासाठी त्वरित कारवाई करतील. तसंच निवडणूक अधिकारी राज्य सरकारी विभागांच्या संकेतस्थळांवरून राजकीय कार्यक्रमांची माहिती लगेचच हटवतील, असं आयोगानं स्पष्ट केलं आहे. मतदार जागरूकतेसाठी रेडियो, दूरचित्रवाणी, सिनेमा आणि सरकारी वाहिन्यांच्या माध्यमातून कार्यक्रम प्रसारित करता येतील. विधानसभा निवडणूक होणाऱ्या राज्यांमध्ये तक्रारींचं निवारण होण्यासाठी, १९५० या क्रमांकावर एका कॉल

सेन्टरची स्थापना करण्यात येत असल्याचंही आयोगानं नमूद केलं आहे. गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या उमेदवारांना सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार त्यांच्यावरच्या गुन्ह्याची माहिती पक्षाची वेबसाइट, वृत्तपत्र आणि दूरचित्रवाणी वाहिन्यांवर तीन वेळा प्रसारित करावी लागेल. तसंच समाज माध्यमांवरही द्यावी लागेल असंही आयोगानं सांगितलं आहे. प्रचारामध्ये कोणत्याही पक्षाला लहान मुलांचा वापर करता येणार नाही असं आयोगानं स्पष्ट केलं असून, निवडणूक प्रक्रिया पारदर्शक आणि निःपक्षपाती पद्धतीनं होण्यासाठी केंद्रीय निवडणूक आयोगानं, २,१०० निरीक्षकांची नेमणूक केली आहे.

निवडणूक रोखे

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार, निवडणूक आयोगानं आज न्यायालयाच्या रजिस्ट्रीमधून इलेक्टोरल बाँड्स अर्थात निवडणूक रोख्या संबंधित डिजीटल स्वरूपात प्राप्त केलेली माहिती आपल्या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिली आहे. www.eci.gov.in/candidate-political-party वर ही माहिती नागरिक पाहू शकतात. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार राजकीय पक्षांनी निवडणूक रोख्यांवरील माहिती पाकीट बंद स्वरुपात दाखल केल्याचं आणि हि पाकिटं तशाच स्वरुपात न्यायालयाकडं सोपविल्याचं आयोगानं एका निवेदनात म्हटलं आहे. या वर्षी १५ मार्च रोजी सर्वोच्च न्यायालयानं दिलेल्या आदेशाचं पालन करत सर्वोच्च न्यायालयाच्या रजिस्ट्रीनं ही बंद पाकिटातील माहिती भौतिक आणि डिजीटल स्वरूपात, पेन ड्राईव्हमध्ये परत केली आहे. यातील माहिती रविवारी सायंकाळी पाच वाजेपर्यंत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्याची सूचना, सर्वोच्च न्यायालयानं निवडणूक आयोगाला दिली होती. त्यानुसार निवडणूक आयोगानं आज दुपारी साडेतीन वाजता ही माहिती त्यांच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली आहे.

भूतान राजा

भूतान महाराष्ट्राशी हरित व्यवसाय, पर्यटन, शिक्षण आणि सांस्कृतिक सहकार्य वाढविण्यास उत्सुक असून, लवकरच भूतान महाराष्ट्रात आपल्या सांस्कृतिक महोत्सवाचं आयोजन करणार आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक महोत्सवाचं देखील भूतानमध्ये आयोजन केलं जाईल असं प्रतिपादन, भूतानचे पंतप्रधान दाशॉ छेरिंग तोबगे यांनी केलं. जानेवारी महिन्यात पंतप्रधान झाल्यावर आपल्या पहिल्याच भारत भेटीवर आलेले भूतानचे पंतप्रधान, दाशॉ छेरिंग तोबगे आणि त्यांच्या पत्नी ओम ताशी डोमा यांचं महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस यांनी आज राजभवनात स्वागत केलं त्यावेळी ते बोलत होते.

## अकोला मतदारसंघ

अकोला मतदारसंघात परंपरागत लढतीमध्ये यावेळी **ॲ**ड.प्रकाश आंबेडकरांपुढे भाजपकडून विद्यमान खासदार संजय धोत्रे यांच्याऐवजी त्यांच्या पुत्राचे आव्हान पुढे ठाकले आहे. भाजपनं दुसऱ्या यादीत अकोल्यातून अनुप धोत्रे यांची उमेदवारी जाहीर केली आहे. वंचित आणि 'मविआ' एकत्रित येण्याचा निर्णय 'मुद्द्यां'मध्ये अडकला असून, अकोल्यात काँग्रेसच्या भूमिकेवर निवडणुकीचे समीकरण ठरेल. 'मविआ'सोबत वंचितचा समझोता झाल्यास दुरंगी, अन्यथा पुन्हा एकदा अकोल्यात तिरंगी लढत रंगण्याची चिन्हे आहेत. अकोला लोकसभा मतदारसंघ भाजपचा गड म्हणून ओळखला जातो. साडेतीन दशकांमध्ये लोकसभेच्या दोन निवडणुकांचा अपवाद वगळता भाजपनं आपलं वर्चस्व अबाधित राखलं आहे.

## राष्ट्रीय स्वयंसेवक संघ

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरकार्यवाह म्हणून दत्तात्रेय होसबळे यांची फेरनिवड करण्यात आली आहे. नागपुरात सुरू असलेल्या अखिल भारतीय प्रतिनिधि सभेच्या आज समारोपीय दिवशी ही घोषणा करण्यात आली. दत्तात्रेय होसबळे हे वर्ष २०२१ पासून या पदावर आहेत. सरकार्यवाहचा कार्यकाळ तीन वर्षांचा असतो. त्यामुळं दत्तात्रय होसबळे २०२७ पर्यंत या पदावर राहणार आहेत. दत्तात्रेय होसबळे हे कर्नाटकातील शिमोगा येथील रहिवासी असून १९६८ साली त्यांनी संघात प्रवेश केला होता.

## निवडणूक तयारी

लोकसभा निवडणुकीचा बिगुल वाजला असून, सर्व जिल्ह्यात या दृष्टीनं तयारी सुरु आहे. नागपूर-रामटेक लोकसभा मतदार संघाची निवडणूक १९ एप्रिल रोजी पहिल्या टप्प्यात होत असून, प्रशासनानं सर्व तयारी केली आहे. याबाबत जिल्हाधीकारी डॉ.विपीन इटनकर यांनी काल पत्रकार परिषदमध्ये माहिती दिली. यवतमाळ जिल्ह्यात लोकसभा निवडणुकीसाठी ४३ विशेष मतदान केंद्र तयार करण्यात आली आहेत. यात बारा आदर्श मतदान केंद्राचा समावेश आहे. सात मतदान केंद्र महिला, सात मतदान केंद्र युवक तर सात मतदान केंद्र, दिव्यांगाव्दारा संचालित केले जाणार आहे. लोकसभेसाठी मतदारांनी जास्तीत जास्त मतदान करावं असं आवाहन जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांनी केलं. अमरावती लोकसभा मतदार संघासाठी दुसऱ्या टप्प्यात २६ एप्रिलला मतदान होणार असून, यासाठी प्रशासनाची तयारी सुरू आहे. जिल्ह्यात आचार संहितेची कडक अंमलबजावणी होणार असून, नागरिकांना सुद्धा, आचारसंहितेचा भंग होत असल्यास, सी-व्हिजिल ॲप वर तक्रार नोंदवावी असं आवाहन, जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी केलं आहे. लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात चंद्रपूर लोकसभा मतदारसंघात १९ एप्रिल रोजी मतदान होणार आहे. चंद्रपूर लोकसभा क्षेत्रात चंद्रपूर जिल्ह्यातील राजुरा, चंद्रपूर, बल्लारपूर,

वरोरा असे चार तर यवतमाळ जिल्ह्यातील वणी आणि आर्णी या दोन विधानसभा क्षेत्रांचा समावेश होतो. या निवडणुकीसाठी २०५ मतदान क्षेत्र असून, व्यवस्थापनासाठी २३५ क्षेत्रीय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. केंद्रीय राखीव पोलीस दलाची एक कंपनी सध्या जिल्ह्यात तैनात असून, आणखी तीन कंपन्या मतदान प्रक्रियेपर्यंत जिल्हा प्रशासनाच्या मदतीसाठी येणार आहेत. चंद्रपूरच्या एमआयडीसी भागातील वखार महामंडळ इथ सुरक्षा गृह आणि मतमोजणी केंद्र तयार करण्यात आलं असून, चार जून रोजी याच ठिकाणी मतमोजणी होणार अशी माहिती जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी दिली.

राहुल गांधी-भारत जोडो यात्रा

अधिकार आणि विचारांचं केंद्रीकरण झालेली भाजपची विचारसरणी आणि सर्वांना स्थान देणारी काँग्रेसची विचारसरणी असा लढा आपल्याला लढायचा असल्याची भावना काँग्रेस नेते, खासदार राहुल गांधी यांनी आज, न्याय संकल्प यात्रेच्या समारोपात व्यक्त केली. राहुल गांधी यांनी आज मुंबईत मणीभवन ते ऑगस्ट क्रांती मैदान अशी न्याय संकल्प पदयात्रा काढली. या यात्रेत राहुल गांधी यांच्यासोबत, महासचिव प्रियंका गांधी, महात्मा गांधींचे पणतू, तुषार गांधी, अभिनेत्री स्वरा भास्कर यांच्यासह सामाजिक संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते. तेजपाल सभागृहात काँग्रेस समर्थकांना संबोधित करतांना देशातील सर्वच समाजघटकांवर अन्याय होत असून, शेतकरी, मजुर, कामगार, व्यापारी अशा प्रत्येक घटकाला, स्वतःवर होणारा अन्याय जाणवत असला तरी इतरांवरील अन्यायाची त्यांना कल्पना नसल्यानं देशात सत्तेविरोधात आंदोलन उभे राहत नसल्याची खंतही राहुल गांधी यांनी यावेळी व्यक्त केली. दरम्यान, आज सायंकाळी शिवाजी पार्क इथं भारत जोडो यात्रेची समारोप सभा होणार आहे. या सभेच्या माध्यमातून इंडिया आघाडी लोकसभा निवडणुकांच्या प्रचाराची सुरुवात करणार आहे.

हवामान

नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागानं वर्तवलेल्या अंदाजानुसार आज पूर्व विदर्भामध्ये तुरळक ठिकाणी गारपीट, विजांचा कडकडाट आणि  वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली असून, पुढील दोन दिवस भंडारा, गोंदिया आणि नागपूर जिल्ह्यात अतिवृष्टीचा ऑरेंज अलर्ट घोषित करण्यात आला आहे. दरम्यान, पुढिल दोन तासात अमरावती, यवतमाळ, अकोला आणि नागपुर इथ तुरळक ठिकाणी गारपीट, वादळ वा-यासह हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे. पुढील तीन दिवस कमाल तापमानात दोन ते तीन अंश सेल्सिअसची घट होण्याची शक्यता हवामान खात्यानं वर्तविली आहे. दरम्यान, मागील २४ तासांत, विदर्भात सर्वात अधिक तापमान अकोला इथं

३९.२ अंश सेल्सिअस तर किमान तापमान वाशीम इथ १७.६ अंश सेल्सिअस इतकं नोंदविण्यात आलं.

## वाशीम हळद

यंदा दुष्काळी परिस्थितीमुळं हळदीची लागवड घटली असूनही, वाशीम जिल्ह्यात हळदीच्या भावानं आतापर्यंतचा विक्रमी टप्पा पार केला आहे. रिसोड कृषी उत्पन्न बाजार समितीत, कांडी हळदीला कमाल १८ हजार २०० रुपये प्रतिक्विंटलचा दर मिळाला. कमी उत्पादन आणि चांगली मागणी यामुळं हळदीचे भाव वाढल्यानं हळद उत्पादकांना दिलासा मिळाला असून, बाजारात हळदीची आवकही वाढली आहे.

## मनोज जरांगे पत्रकार परिषद

राज्य शासनानं मराठा आरक्षणासाठी काढलेल्या अधिसूचनेतल्या, सगेसोयरे कायद्याची अंमलबजावणी करावी, मराठा आंदोलकांवरचे गुन्हे मागे घ्यावेत, या मागण्यांचा पुनरुच्चार मराठा आरक्षणासाठी आंदोलन करणारे मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे. जालना जिल्ह्यात अंतरवाली-सराटी इथं वार्ताहर परिषदेत ते बोलत होते. दरम्यान, भाजप नेते अशोक चव्हाण यांनी काल रात्री उशिरा अंतरवाली-सराटीत येऊन मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली.

## एस.चोक्कलिंगम

राज्यात लोकसभा निवडणुकीत मतदानाचं प्रमाण ७५ टक्क्यांपर्यंत नेण्यासाठी विविध पातळीवर प्रयत्न सुरू असल्याचं राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी, एस.चोक्कलिंगम यांनी म्हटलं आहे. भारत निवडणूक आयोगानं लोकसभा निवडणुकीचं वेळापत्रक जाहीर केल्यानंतर ते काल मुंबईत बातमीदारांशी बोलत होते. यावेळी त्यांनी राज्याच्या निवडणूक तयारीविषयी माहिती दिली.